Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 04 November 2026
Time 01.00 to 01.05 PM
Language Marathi
आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
प्रादेशिक बातम्या
दिनांक ०४ नोव्हेंबर २०२६ दुपारी १.०० वा.

****

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमुळे संधींचा विस्तार होऊन अर्थव्यवस्थांचं लोकशाहीकरण होण्यास मदत झाली आहे. यासंदर्भात भारताचं उदाहरण मार्गदर्शक असल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. अँटिग्वा आणि बार्बुडा इथं आयोजित 'कॉमनवेल्थ हेड्स ऑफ गव्हर्नमेंट'च्या कार्यकारी सत्रात त्यांनी सुशासन आणि आर्थिक जबाबदारीसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला. भारताने विविध देशांशी अलीकडे केलेल्या मुक्त व्यापार करारांमुळे व्यापाराला चालना मिळेल आणि पुरवठा साखळी अधिक लवचिक होण्यास मदत होईल, असंही जयशंकर यांनी नमूद केलं.

****

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले आद्यक्रांतिकारक आणि सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके यांची आज जयंती. ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र बंड पुकारणारे पहिले क्रांतिकारक म्हणून ते ओळखले जातात. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वासुदेव बळवंत फडके यांना आदरांजली वाहिली. फडके हे भारतीय सशस्त्र क्रांतीचे जनक तसंच आपल्या देशवासियांच्या स्वातंत्र्यासाठी आणि आत्मसन्मानाच्या रक्षणासाठी लढलेल्या असंख्य क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान होते असं शाह यांनी सामाजिक माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

****

स्वदेशी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय क्षमता बळकट करण्यासाठी इंडिया एआय मिशनअंतर्गत तीन नव्या पायाभूत मॉडेल्सचा प्रारंभ करण्यात आला आहे. 'एका-वन', 'धीर टू-बी' आणि 'धीर फाइव्ह-बी' अशी या मॉडेल्सची नावं आहेत. या कार्यक्रमाला इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन उपस्थित

होते. या मॉडेल्सचा उपयोग सायबर सुरक्षेसह विविध क्षेत्रांमध्ये करता येणार असून, देशाची धोरणात्मक आत्मनिर्भरता अधिक बळकट होईल, असं एस. कृष्णन यांनी सांगितलं.

****

भारताची पहिली अंतराळ-आधारित सौर वेधशाळा आदित्य-एल वननं शक्तिशाली सौर उद्रेक अंतराळात कसे पसरतात, याबाबत नवी माहिती दिली आहे. आदित्य-एल वन आपल्या सात वैज्ञानिक पेलोड्सच्या माध्यमातून सूर्याचं सातत्यानं निरीक्षण करत आहे. यातील व्हिजिबल एमिशन लाइन कोरोनोग्राफ या उपकरणाच्या मदतीनं शास्त्रज्ञांना सौर उद्रेकांचा असमान विस्तार शोधण्यात यश आलं आहे. या उद्रेकांचा अंतराळातील हवामानावर परिणाम होऊ शकतो, अशी माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयानं दिली आहे. या संशोधनामुळे उपग्रह, दळणवळण नेटवर्क आणि इतर अंतराळ-आधारित यंत्रणांवर परिणाम करणाऱ्या अंतराळातील परिस्थितीचं आकलन अधिक चांगलं होण्याची अपेक्षा आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शिवसेना उद्धव बाळासहेब ठाकरे गटाचे नेते डॉ. संतोष टारफे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार संतोष बांगर यांच्या उपस्थितीत आज हा पक्षप्रवेश सोहळा झाला. डॉ. संतोष टारफे हे आदिवासी समाजाचं नेतृत्व करत असून, त्यांच्या माध्यमातून या समाजाच्या उन्नतीसाठी अधिक व्यापक काम करण्याची संधी मिळेल, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

****

'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' या स्पर्धेला युवकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, या स्पर्धेसाठी एक लाख सात हजारांहून अधिक जणांनी नोंदणी केली आहे. स्पर्धेत एकूण १६ हजार ५७ नव्या कल्पना सादर झाल्या, यातल्या ५० विजेत्यांना प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी दिला जाणार असल्याची माहिती मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. युवकांनी केवळ नोकरी शोधणारे न राहता रोजगार निर्माण करणारे उद्योजक व्हावं, हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी – २०२६ पदवी परीक्षांना येत्या १७ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या परीक्षांची प्रवेशपत्रं विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रं वेळेत डाउनलोड करून विद्यार्थ्यांना वितरित करावीत, असे निर्देश विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या वतीनं देण्यात आले आहेत.

दरम्यान, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने दिवाळीनिमित्त विद्यापीठातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. आठ, दहा आणि ११ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्ट्या आहेत, याशिवाय ९, १२, १३ आणि १४ नोव्हेंबरला अतिरिक्त सुट्ट्या देण्यात आल्या आहेत.

****

सेनेगल मधल्या डकार इथं सुरू असलेल्या युवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत भारताच्या राजकुमारी लांचेनबी चानू हिनं महिलांच्या वुशू प्रकारात ऐतिहासिक कांस्यपदक पटकावलं आहे. डकार २०२६ युवा ऑलिम्पिकमध्ये वुशू खेळाचा प्रथमच समावेश करण्यात आला असून, या स्पर्धेत पदक जिंकणारी राजकुमारी ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया आणि राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी या यशाबद्दल राजकुमारी हिचं अभिनंदन केलं. तिच्या या यशातून देशातल्या लाखो युवा खेळाडूंना मोठी स्वप्नं पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळो, असं त्यांनी म्हटलं आहे.

****